JES Bulletin, 2(3):15-22, July – 2024

*Open Access, Peer Reviewed, Research Journal*
©JES Printer and Publisher
Print & Online available on https://jesbulletin.in

**Research Article**

# महाराष्ट्रातील कोळी जमातीचे वर्गीकरण व वैशिष्ट्यपूर्ण व्यावसयिक परंपरा

संशोधक विद्यार्थी
**श्री. प्रभुदास रामदास बेराळे**
इतिहास विभाग प्रमुख
जे. ई. एस. महाविद्यालय जालना

संशोधक मार्गदर्शक
**प्रो. डॉ. विलास श्रीरंग जाधव**
इतिहास विभाग प्रमुख
जे. ई. एस. महाविद्यालय जालना

Email Id:- prabhuberale@gmail.com

**प्रस्तावना :**

`कोळी` ही संज्ञा विविध उपजमातींच्या संदर्भात समूहदर्शक जमातीचे नाम असून 'महाराष्ट्रात' या समूहदर्शक जमातीच्या नामांतर्गत महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी, सोन कोळी या चार मुख्य उपजमाती येतात. थोडक्यात 'कोळी' ही जात नसून जमात आहे व तिच्या विविध उपजमातींच्या संदर्भात समूहदर्शक वा समूहवाचक नाम अथवा संज्ञा आहे.कोळी लोकांच्या उत्पत्तीसाठी 'व्हेना' नावाच्या राजाची कथा सांगितली जाते. ह्या राज्याच्या मृत्यूनंतर त्याच्या शरीराच्या प्रत्येक अवयापासून एक एक जमात जन्मास आली व कोळी लोकांची उत्पत्ती या राजाच्या पायापासून झाली अशी दंतकथा भागवत पुराणात आलेली आहे.[1]

मानववंश शास्त्रज्ञ आर.इ. एंथोवेन यांनी लिहिलेल्या त्यांच्या 'The Tribes and Castes of Bombay Presidency' 1922,Vol.2, Page No.245. तसेच महाराष्ट्र सरकारने प्रकाशित केलेल्या 'Maharashtra : Lands and Its People' मधील पान नंबर 73 नुसार महाराष्ट्र राज्यामध्ये कोळी या आदिवासी जमातीमध्ये खालील चार मुख्य वर्ग आढळतात.

- मल्हार कोळी - पानभरे कोळी, कुनम कोळी, चुंबळे कोळी.
- ढोर कोळी - टोकरे कोळी , कबेर कोळी किंवा कब्बलीगेर कोळी.

[1] चित्रावशास्त्री : प्राचीन चरित्रकोश,पृ.क्र.554.

- सोन कोळी - मच्छीमार कोळी, वैती कोळी, मांगेला कोळी, ख्रिश्चन कोळी.
- महादेव कोळी - राज कोळी, डोंगर कोळी.[2] व[3]

अशाप्रकारे 'कोळी' या जमातीचे मुख्य चार उपगट असून सर्व उपगट 'कोळी' या समूहवाचक नामाविषयी आग्रह धरतात. महाराष्ट्रात प्रामुख्याने मल्हार कोळी, ढोर कोळी, सोन कोळी व महादेव कोळी या जमातीचे वास्तव्य आढळून येते यापैकी सदर शोध निबंधात आपण कोळी जमातीची उत्पत्ती व वर्गीकरण व मल्हार कोळी, ढोर कोळी, सोन कोळी या तीन जमातीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अर्थात त्यांचे व्यवसाय व त्यांची जीवन वैशिष्ट्ये यािवषयी माहिती पाहणार आहोत.

**अ) मल्हार कोळी जमात :**

'मल्हार' या शब्दाची उत्पत्ती 'माला' या द्रविड शब्दापासून झालेली असून त्याचा अर्थ 'टेकडी' असा आहे. 'कोळी मल्हार' हा समाज सर्वसाधारणपणे 'मल्हार कोळी' म्हणून ओळखला जातो. 1981 च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या 1,77,367 ऐवढी असून त्यांची वस्ती प्रामुख्याने ठाणे जिल्ह्यातील पालघर, डहाणू, वाडा, जव्हार, वसई, भिवंडी तालुक्यात आहे. मल्हार कोळी' ही जमात सह्याद्रीच्या टेकड्यावरून खाली आली आणि ती ठाणे जिल्ह्यातील मैदानी भूप्रदेशात स्थायिक झाली आहे.[4]

कॅप्टन मॅकिंटोश हा महादेव कोळी जमातीचा प्रथम अभ्यासक आपल्या "Transaction of the Bombay Geographical Society" या ग्रंथात मल्हार कोळी जमातीबाबत असे म्हणतो.

"This Koli Seems to be one of the most pure and respectable of all koli."[5] मल्हार कोळी हा सर्व कोळी जमातींपैकी सर्वात शुध्द आणि आदरणीय वाटतो.

मल्हार कोळी हे 'मल्हार कोळी' या नावानेच प्रसिद्ध आहेत त्यांच्या नावाशी संबंधित दोन मतप्रवाह प्रचलित आहेत. ते असे- 1) द्रविडीयन शब्द 'माला' म्हणजे डोंगर, म्हणून मल्हार कोळी. 2) मल्हार देवाची पूजा करणारे ते मल्हार कोळी. काही मल्हार कोळी लोकांना मल्हार कोळी नावाचा उगम कसा झाला हे माहित नाही.

---

[2] Enthoven R.E. 'The Tribes and Castes of Bombay Presidency', 1922,Vol.2, Page No.245.

[3] Maharashtra : Lands and Its People.govt.publication 1933 page No.73,74.

[4] गारे डॉ.गोविंद,'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', कॉन्टीनेन्टल प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती 2000 पृ.क्र.133.

[5] Caption Makintosh, 'Transaction of the Bombay Geographical Society' 1836 -38 page No.191.

काही मल्हार कोळी आपले पूर्वज खंडोबाची अर्थात मल्हार देवाची पूजा करत असत त्यामुळे आपले नाव मल्हार कोळी पडले असावे असे सांगतात.[6]

**1) मल्हार कोळी जमातीचा व्यवसाय :**

ग्रामीण भागात या जमातीचे लोक पाणी भरण्याचा व्यवसाय करतात त्यामुळे त्यांना 'पाणीभरे कोळी' म्हणतात. तसेच पाण्याचा हंडा डोक्यावर ठेवण्यास चुंबळ बांधत असल्यामुळे त्यांना 'चुंबळे कोळी' असे देखील म्हणतात. आणि काही मल्हार कोळी कुणब्या बरोबर राहत असल्याने त्यांना 'कुनम कोळी' असे संबोधण्यात येते.[7]

**2) मल्हार कोळी जमातीची वैशिष्ट्ये:-**

मल्हार कोळी समाजाचा निनिराळ्या दृष्टीकोनातून अभ्यास केल्यानंतर या समाजाची काही वैशिष्ट्ये सांगता येतात ती खालील प्रमाणे.

1) या जमातीत अनेक कुळे आहेत परंतु पोटकुळे आढळत नाहीत.
2) या समाजातील विधवेच्या लग्नाला 'पाट' असे म्हणतात .
3) ही जमात ठाणे जिल्ह्यातील पालघर, डहाणू वाडा, जव्हार वसई आणि भिवंडी तालुक्यात आहे.
4) मल्हारीचे भक्त असल्याने मल्हार कोळी म्हणून नामाभिधान.
5) मल्हार कोळी यांना पाणभरे कोळी, चुंबळे कोळी या संज्ञा देखील वापरतात.
6) 'हिरवा देव' हा या जमातीचे कुलदैवत असते.
7) 'नारनदेव' आपले संरक्षण करतो अशी या जमातीची धारणा आहे.
8) कामडी नृत्य, घोर नृत्य, ढोल नृत्य हे या जमातीचे नृत्य प्रकार आहेत.

**ब) ढोर कोळी जमात :**

ऐंथोवेन च्या मते ढोर म्हणजे 'पशुधन' या शब्दापासून 'ढोर कोळी' हे नाव तयार झाले असावे. ढोर कोळी कोकणी, मराठी, अहिराणी भाषा बोलतात. ढोर कोळी हे ठाणे आणि नाशिक जिल्ह्यातील डोंगराळ भागातही राहतात. ढोर कोळी महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, राजस्थान, आणि दादरा- नगर हवेली या राज्यांमध्ये पसरलेले आहेत. दादरा-नगर हवेलीत त्यांचे स्थलांतर महाराष्ट्र व गुजरात मधून झालेले आहे. कामाच्या स्वरूपानुसार ढोर कोळी चे दोन भाग पडतात. ढोर कोळी व टोकरे ढोर कोळी.[8]

---

[6] डॉ.कुलकर्णी,शौनक 'महाराष्ट्रातील आदिवासी', डायमंड पब्लिकेशन्स,पुणे, प्रथम आवृत्ती ऑक्टोबर 2009, पृ.क्र.28,29.

[7] महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर : 'महाराष्ट्र :भूमी व लोक' डॉ.त्रि.ना.वळुजकर, डॉ.सुधाताई काळदाते ,डॉ.कि. का. चौधरी, डॉ.वर्षा शिरगांवकर, संपादक डॉ.कि. का. चौधरी, दर्शनिका विभाग ,सास्कृतिक कार्य विभाग,महाराष्ट्र शासन मुंबई-1996.

[8] डॉ.कुलकर्णी शौनक, 'महाराष्ट्रातील आदिवासी',डायमंड पब्लिकेशन्स,पुणे प्रथम आवृत्ती ऑक्टोबर 2009. पृ.क्र.,26 ,27.

ढोर या संज्ञेची उत्पत्ती ढोर एकतर ते मास भक्षण करत असल्यामुळे ढोर या शब्दापासून किंवा कन्नड भाषेतील शब्द 'ढोड्डा' या शब्दापासून झाली असावी. म्हणून त्यांना ढोर कोळी म्हणतात. 'कोलचा' किंवा 'कोलघा' या संज्ञा ढोर कोळी जमातीला उद्देशून वापरल्या जाणाऱ्या तुच्छतादर्शक संज्ञा आहेत. महाराष्ट्रात राज्यातील अनुसूचित जमातींमध्ये 'कोळी ढोर' जमातीला कनिष्ठ समजले जाते. 'कोळी ढोर' समाजाला 'टोकरे कोळी',कोलचा किंवा कोलघा असेही म्हणतात. 1981 च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या 77,4,35 ऐवढी होती. महाराष्ट्र राज्यात नशिक जिल्ह्यातील पेठ व सुरगणा ताल्हुका, ठाणे जिल्ह्यातील जव्हार व मोखाडा तालुके आणि गुजरात राज्यातील सुरत,डांग, बलसाड, धरमपूर आणि बांसदा इथे त्यांची मुख्य वस्ती आहे.[9]

**1) ढोर कोळी यांचे व्यवसाय :**

डॉ.कुलकर्णी यांच्या मते जनावरांची कातडी कमाविणे हा त्यांचा पारंपारिक व्यवसाय असून ते शेती व शेत मजुरी करतात.ढोर कोळी यांची घरे वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये वसवलेली असतात. घरे चौकोनी किंवा आयताकार आकाराची असतात. आणि जमिनीवर कोणत्याही चौथऱ्याशिवाय बांधलेली असतात. कारवीच्या फांद्या, बांबू, लाकडी दांडे, गवत व शेण यांच्या मदतीने घर बांधले जाते. पाळीव प्राणी घरातच बांधले जातात.[10]

**2) ढोर कोळी जमातीची वैशिष्ट्ये :**

ढोर कोळी समाजाचा निनिराळ्या दृष्टीकोनातून अध्ययन केल्यानंतर या समाजाची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

1) ढोर कोळी समाजाला 'कोलचा' किंवा 'कोलघा' अशी तत्सम नावे आहेत.
2) ढोर कोळी जमातीत उपजमाती किंवा उपगट नाहीत.
3) या जमातीत नातेवाईक लोकांसाठी वैशिष्ट्यपूर्ण संबोधन आहे.
4) जमातीच्या मुख्य माणसाला 'पाडा खोत' असे म्हणतात.
5) या जमातीमध्ये अनेक कुळे आहेत परंतु पोटभेद नाहीत.
6) ही जमात नाशिक जिल्ह्यातील पेठ व सुरगणा तालुका व ठाणे जिल्ह्यातील जव्हार व मोखाडा तालुका येथे सापडते.
7) ढोर कोळी समाजात पुनर्विवाहाला मान्यता आहे.
8) या समाजात पुनर्विवाहाला 'म्होतूर' म्हणतात.

[9] गारे डॉ.गोविंद,'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती',कॉन्टीनेन्टल प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती 2000, पृ.क्र.123.
[10] कित्ता.

9) 'गोमतीमाता' आणि 'होळी माता' हे या जमातीचे गाव देव आणि समाजदेव आहेत.

10) डोंगर माऊली व वाघ देव, चेडा इत्यादी देवाची उपासना करतात.

11) या जमातीत पितृसत्ताक कुटुंब पद्धती आहे.

12) या जमातीत 'भगत' हा पूजाविधी करतो.

13) 'पशुधन' या शब्दापासून 'ढोर कोळी' असे नामाभिधान.

**क) सोन कोळी जमात :**

कोकणात समुद्र किनारी राहणाऱ्या कोळी समाजाला 'समुद्र कोळी'किंवा 'सोन कोळी' असे म्हणतात. ठाणे रायगड किनारपट्टीवर बहुसंख्येने सोनकोळी राहतात. कुलाबा अर्थात रायगड गॅझेटियर मध्ये आलेल्या उल्लेखानुसार सोन कोळ्यांचे मूळ वस्ती स्थान रायगड जिल्ह्यात होते. तेथून त्यांनी ठाणे व रत्नागिरी जिल्ह्यात का स्थलांतर केले याचा इतिहास रायगड गॅझेटियर मध्ये नमूद केलेला आहे. त्यानुसार आंगरे यांचे या भागात प्राबल्य असतांना त्यांनी सोनकोळी महिलांवर जोबनपट्टी किंवा चोळीपट्टी बसविली होती. बायकांनी अंगात चोळ्या न घालता अंगावरून पदर घ्यावा व ज्यांना चोळ्या घालावयाच्या आहेत त्यांनी ठराविक कर आंगरे प्रशासनास भरावा, असे कराचे स्वरूप होते. या जाचक नियमामुळे अलिबाग, थळ इत्यादी प्रांतातून सोन कोळी समाजाने स्थलांतर केले. सोनकोळी वसई- ठाण्यापासून रत्नागिरीपर्यंत असल्यामुळे अलिबाग ही त्यांची मुख्य वसाहत होती व तेथे त्यांच्या सर पाटलांचे किंवा जमातीच्या प्रमुखांचे मुख्यालय होते.[11]

**1) सोन कोळी दर्यावर्दी कोळी :-**

सोन कोळी हे उत्तम दर्यावर्दी होते . शिलाहार राजांची साडेचार वर्षांची स्थिर राजवट लाभल्यामुळे कोळी बांधव ठाण्याच्या खाडी किनारी कायमचे स्थिरावले. खाडी व सागरी मार्गाने व्यापारी व प्रवाशी जहाजांचे ने- आण बंदरावरील मालाची चढ- उतार इत्यादी कामे सोन कोळी लोक करित असत. तेव्हा जलवाहतुकीचा बहुतांश व्यापार अरब व्यापाऱ्यांच्या हातात होता. तेव्हा कोळी लोक त्यांच्या संपर्कात राहून त्यांनी सांगितलेल्या बंदरावर व खाडीच्या मुखातून आत गेलेल्या जलमार्गावरील छोट्या छोट्या बंदरापर्यंत मालवाहतुकीचा व्यवसाय चोखपणे करत असत त्यामुळे 'कोळी'आणि पर्यायाने 'ठाणे' आर्थिकदृष्ट्या भरभराटीस आले होते.

[11] टेटविलकर सदाशिव -गावगाडा ( प्राचीन ते अर्वाचीन), श्रीकृपा प्रकाशन, नवी मुंबई,प्रथम आवृत्ती2011, पृ. क्र.22,23,24.

विशेषतः कोळी समाजातील तांडेल आडनाव असणाऱ्यांच्या पूर्वजांनी सागरावर आपला दरारा निर्माण केला होता.[12]

**2) सोनकोळी जमातीची वैशिष्ट्ये :**

सोन कोळी जमातीचे निनिराळ्या दृष्टीकोनातून अध्ययन केल्यानंतर या जमातीचे काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

1) सोन कोळी जमात 'समुद्र कोळी' या विशिष्ट नावाने देखील ओळखला जातो.
2) सोन कोळी जमातीमुळे ठाणे बंदराला 'स्थानिक पत्तन' म्हणून परदेशात ओळख मिळाली.
3) स्त्रियांना या समाजात मानाचे स्थान आहे.
4) या जमातीतील 'नकटा' हा एक हास्यकारक नृत्यप्रकर आहे.
5) 'कोळ्यांचा नाच' असा वैशिष्ट्यपूर्ण नृत्य प्रकार या समाजात आहे.
6) जेजुरीचा खंडोबा व कारल्याची एकविरा आई हे या कोळ्यांची प्रमुख दैवते आहेत.
7) सोन कोळी समाजाला मच्छिमार कोळी, वैती कोळी, मांगेला कोळी, ख्रिश्चन कोळी अशी तत्सम नावे देखील आहेत.
8) सोन कोळी यांची 'दर्यावर्दी कोळी' म्हणून देखील ओळख आहे.
9) या जमातीत देखील पितृसत्ताक कुटुंब पद्धती आहे.
10) कोकणात आजही सोन कोळी जमातीत 'गावपंचायत'आढळते.
11) या समाजात गावपंचायतीची 'संघपंचायत' एक सामाजिक संघटना असते की, जे सामाजिक निवाडे करते.
12) सोन कोळी यांचे मूळ वस्तीस्थान रायगड जिल्ह्यातील आहे.
13) सोन कोळी समाज आजच्या स्थितीत ठाणे, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात आढळते.
14) या जमातीतील स्त्री- पुरुषांची परंपरागत वेशभूषा.

**निष्कर्षः-**

एकंदरीत उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्रातील मल्हार कोळी, ढोर कोळी, सोन कोळी या आदिवासी जमातींचे अध्ययन केले असता असा निष्कर्ष काढता येतो की,

[12] भरनैया आर.सी. 'कोली जाती का इतिहास', अन्वेषक एवं संग्रहकर्ता,मध्यप्रदेश प्रकाशन ,2011,पृ.क्र.22.

या सर्व जमातींच्या  नावातील उपप्रकारासमोर 'कोळी' हे सामन्य नाव जरी सारखे असले तरी या जमाती सामाजिक, व्यावसायिक व सास्कृतिक दृष्टया विभिन्न आहेत अर्थात या स्वंतंत्र जमाती आहेत. कोळी ही सर्वसाधारण संज्ञा निरनिराळ्या विभागातील लोकांच्या संदर्भात वेगवेगळ्या अर्थाने वापरली जाते त्यातील प्रत्येक उपगट स्वतंत्र जात किंवा जमात आहे त्यांचे वेगवेगळे व्यवसाय आहेत, संस्कृती आहे, भाषा आहे, देवी दैवते आहेत व अनेकविध भाषेत व निरनिराळ्या ग्रंथात कोळी या शब्दाचे उच्चारण हे वेगवेगळे आहे हे नाकारता येत नाही. महाराष्ट्रात महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर कोळी या जमाती सह्याद्री व सातपुड्याच्या डोंगर भागात आढळतात  तर सोन कोळी हे कोकणच्या पश्चिम किनारपट्टीवर मासेमारी व्यवसाय करतांना आढळतात तर टोकरे कोळी हे खानदेशात आढळतात. उपरोक्त जमाती ह्या स्वातंत्र्य प्रिय व स्वच्छंदी प्रवृत्तीच्या निसर्गवादी जमाती आहे.

**संदर्भ:-**


1) चित्रावशास्त्री : प्राचीन चरित्रकोश,पृ.क्र.554.
2) Enthoven R.E. 'The Tribes and Castes of Bombay Presidency' 1922,Vol.2, Page No.245.
3) Maharashtra : Lands and Its People.govt.publication 1933, page No.73,74.
4) गारे डॉ.गोविंद, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', कॉन्टीनेन्टल प्रकाशन,पुणे, प्रथम आवृत्ती 2000, पृ.क्र.133.
5) Caption Makintosh, 'Transaction of the Bombay Geographical Society' 1836 -38, page No.191.
6) डॉ.कुलकर्णी शौनक 'महाराष्ट्रातील आदिवासी', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती ऑक्टोबर 2009, पृ.क्र.28,29.
7) महाराष्ट्र राज्य गॅझेटीयर : 'महाराष्ट्र :भूमी व लोक' डॉ. त्रि. ना. वळुजकर, डॉ.सुधाताई काळदाते, डॉ.कि. का. चौधरी, डॉ.वर्षा शिरगांवकर, संपादक डॉ.कि. का. चौधरी, दर्शनिका विभाग, सास्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई-1996.
8) डॉ.कुलकर्णी शौनक, 'महाराष्ट्रातील आदिवासी',डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती ऑक्टोबर 2009,पृ.क्र.26,27.

9) गारे डॉ.गोविंद, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2000, पृ.क्र.123.
10) कित्ता.
11) टेटविलकर सदाशिव -गावगाडा ( प्राचीन ते अर्वाचीन), श्रीकृपा प्रकाशन, नवी मुंबई, प्रथम आवृत्ती 2011, पृ. क्र.22,23,24.
12) भरनैया आर.सी. 'कोली जाती का इतिहास',अन्वेषक एवं संग्रहकर्ता, मध्यप्रदेश प्रकाशन,2011, पृ.क्र.22.